www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 163 वार गुरुवार दि. 27 फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थित आज तळोजात 10 कोटींचे अंमली पदार्थ करण्यात आले नष्ट

दैनिक युवक आधार
पनवेल, वार्ताहर

महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत आज तळोजा 10 कोटींचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत. विविध ठिकाणच्या कारवाईदरम्यान जप्त केलेल्या अंमली पदार्थाचा साठा नष्ट करण्याची कारवाई यंत्रणांकडून केली जाते. नवी मुंबई पोलिसांनी विविध दाखल गुन्हयांत यापूर्वी सुमारे 10 कोटींचा अंमली पदार्थाचा साठा जप्त केला असून सदरचा हा अंमली पदार्थांचा साठा नवी मुंबई पोलिसांकडून आज बुधवार दि.26 फेबुरवारी रोजी नष्ट केला. यावेळी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर व नवी मुंबईचे पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज तळोजा एमआयडीसी प्लॉट नं-पी-32 येथे मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेडच्या भूखंडावर हा अंमली पदार्थ नष्ट करण्याचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई, दिपक साकोरे, अतिरिक्त पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई, प्रशांत मोहिते, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-2, पनवेल, अजय लांडगे, गुन्हे शाखा, नवी मुंबई, तळोजा पोलीस ठाण्याचे वपोनि प्रवीण भगत आदींसह इतर पदाधिकारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते.




# वीस महिने सुरक्षा रक्षकाची नोकरी केल्यानंतर ठेवले प्रतीक्षा यादीवर

## रायगड सुरक्षा रक्षक मंडळाचा भोंगळ कारभार, सुरक्षा रक्षकाचे आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

वीस महिने तळोजा येथील आस्थापनेत सुरक्षा रक्षकाची नोकरी केल्यानंतर रायगड सुरक्षा रक्षक मंडळाने वृषाल पाटील याला प्रतीक्षा यादीत ठेवले. त्यामुळे रायगड सुरक्षा रक्षक मंडळाचा भोंगळ कारभार उघडकीस आला आहे. या विरोधात सुरक्षा रक्षक वृषाल पाटील याने 25 फेब्रुवारीपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. तळोजा येथील इंडियन ऑइल आस्थापनेत फेब्रुवारी 2023 पासून वृषाल पाटील हा सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. 2023 मध्ये सुरक्षारक्षक मंडळातर्फे आस्थापनेत तैनात करण्यात येत असल्याचे पत्र देण्यात आले होते. त्यानंतर डिसेंबर 2024 मध्ये आस्थापनेला पाटील याची नियुक्ती ही मंडळाच्या सचिवांच्या अपरोक्ष, मंडळाच्या नियुक्तीसाठीचे सर्व नियम




डावलून करण्यात आली असून त्याबाबत मंडळाने दखल घेऊन पुढील कार्यवाही सुरू केली आहे आणि पाटील याची नियुक्ती पूर्वी ते ज्या तालुक्याच्या प्रतीक्षा यादीवर व ज्या क्रमांकावर होते त्याच क्रमांकावर परत घेण्यात येत असल्याचे कळवले आहे. तसेच पाटील यांच्या ऐवजी नियमानुसार अन्य सुरक्षा रक्षक वितरित करण्यात येईल आणि वृषाल पाटील याला तात्काळ कार्यमुक्त करावे असे सचिव स्नेहल माटे यांनी कळविले आहे. मात्र आस्थापनेने आम्हाला पाटील हाच सुरक्षा रक्षक हवा असल्याचे कळवले असल्याचे पाटील यांचे म्हणणे आहे. तसेच आमदार महेंद्र दळवी यांनी देखील वृषाल पाटील याला इंडियन ऑइल आस्थापनेत नोकरी रुजू करण्याबाबत आणि अडकलेले पगार देण्यात यावे असे पत्र रायगड जिल्हा सुरक्षा मंडळला दिले आहे. मात्र तरी देखील वृषाल पाटील याला नोकरी न मिळाल्याने 25 फेब्रुवारी पासून खांदा कॉलनी येथील कार्यालयाजवळ त्याने आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. लवकरात लवकर न्याय मिळुन नोकरी मिळावी अशी अपेक्षा त्याने व्यक्त केली आहे.

## करंजा गावात मासेमारी बोटींना आग लागण्याच्या दोन दिवसात दोन घटना

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

उरण तालुक्यातील करंजा गावातील समुद्रकिनारी डागडुजीसाठी मासेमारी बोटी उभ्याकरण्यात येतात, काल व आज डागडुजी सुरू असलेल्या दोन मासेमारी बोटींना आग लागण्याची घटना घडली. असल्याने बोट मालकान मध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आज दुपारच्या वेळेत वेल्डिंगचे काम सुरू असताना बोरीतील काही भागाला अचनक आग लागण्याची घटना घडली. त्वरित घटनास्थळी अग्निशमन दलाची गाडी दाखल होऊन जवानांनी आग विझवली अन्यथा आगीचा भडका उडून आजूबाजूच्या उभ्या असलेल्या बोटींना आग लागण्याची शक्यता होती. दोन दिवसांत दोन बोटींना आगी लागण्याची दुर्दैवी घटना घडल्याने मालक वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे..



## स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त करण्यात आले अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त आज विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संघटना यांनी शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक आज सकाळी उपस्थित राहून त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी रायगड जिल्हा भाजपाध्यक्ष अविनाश कोळी, केशवस्मृती पतपेढीचे अध्यक्ष अमित ओझे, सामाजिक कार्यकर्त्या माधुरी गोसावी, मा.नगरसेवक संजय गुरुजी, संजय कदम, भाजप युवा मोर्चाचे अभिषेक पटवर्धन, शिवसेना विभागप्रमुख (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे लक्ष्मण पांचाळ, सौ.स्वाती कोळी यांच्यासह केशवस्मृती पतपेढीचे पदाधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

## महावितरण विभागातील कार्यकारी अभियंता यांची तात्काळ बदली करा - विकास क्षत्रिय यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**



महावितरण विभागीय कार्यालय,बारामती येथे कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंता (प्रशासन विभाग) हे गेली चार वर्ष एकाच ठिकाणी काम करत असून यांच्या तात्काळ बदलीसाठी माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती इंदापूर तालुकाच्या वतीने निवेदन देण्यात आले. समितीचे तालुका अध्यक्ष श्री. विकास क्षत्रिय यांनी अधीक्षक अभियंता,बारामती ग्रामीण मंडळ यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे की,सदर अभियंता 15 सप्टेंबर 2020 पासून एकाच पदावर कार्यरत असून, महावितरणच्या अंतर्गत बदली धोरणानुसार नियमानुसार त्यांची बदली होणे आवश्यक आहे. तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे की, एका जागी इतक्या प्रदीर्घ काळापर्यंत एकाच अधिकाऱ्याची नियुक्ती राहिल्यास कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता असते तसेच गैरप्रकारांना वाव मिळू शकतो.त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याची बदली तातडीने करून नव्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात तातडीने कार्यवाही न झाल्यास पुढील प्रशासकीय प्रक्रिया राबवण्यात येईल,असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. आता महावितरण प्रशासन या मागणीवर काय भूमिका घेते,याकडे लक्ष लागले आहे.

बारामती अधीक्षक अभियंता लहामगे साहेब यांनी निवेदन स्वीकारते वेळी सांगितलं की आपण दिलेले निवेदन हे वरिष्ठ कार्यालयाला पाठवून आपल्याला आठ दिवसात त्याचा अहवाल देण्यात येईल.

## श्री सिद्धेश्वर महाराज संस्थान धोत्रा यात्रा महोत्सवास सुरुवात

दैनिक युवा आधार
प्रतिनिधीः-योगेश पालोदकर

सिल्लोडः- तालुक्याचे आराध्य दैवत श्री सिद्धेश्वर महाराज यांच्या २१ दिवसांच्या यात्रा महोत्सवास मोठ्या थाटात महाशिवरात्रीपासून सुरुवात झाली आहे. यात्रा १७ मार्च पर्यंत राहील. प्रतिवर्षीप्रमाणे महाशिवरात्रीच्या दिवशी श्री सिद्धेश्वर महाराज यांचा सकाळी अभिषेक करण्यात आला व पूजा करण्यात आली. सायंकाळी श्रीच्या पालखीचे पूजन गावात भव्य मिरवणूक काढण्यात आली. श्री सिद्धेश्वर टेकडीवर आतषबाजी करण्यात आली. महाशिवरात्रीनिमित्त श्रीक्षेत्र धोत्रा येथे भजनी मंडळी दाखल झाल्यानंतर टाळ मृदुंगाच्या गजरात श्रीक्षेत्र धोत्रा दुमदुमून गेले. परिसरासह अनेक जिल्ह्यातून भाविक मोठ्या संख्येने धोत्रा येथे श्रीच्या दर्शनासाठी आले होते सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. यावर्षी भाविकांचा उत्साह पाहता खूप मोठ्या प्रमाणात व्यावसायिक आलेले आहे. यात्रेत फिरती सिनेमागृहे, रहाट पाळणे, लहान मुलांची पाण्यातील जहाजे, संसारोपयोगी साहित्याची दुकाने, खानावळी, हॉटेल्स, खेळण्याची दुकाने आधी थाटली आहेत. फास्ट फूडच्या जमान्यात आजही सर्वसामान्य जनता दाळ्या- रेवड्यांना प्राधान्य देताना दिसत आहे. यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी श्री संस्थान व प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवला आहे



## इनरव्हील क्लब पनवेलचा यशस्वी मेगा प्रोजेक्ट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**




नऊ ते पंधरा वर्षे या वयोगटातील मुलींसाठी निरोगी आरोग्याच्या दृष्टीने सी.पी.ए.ए.यांच्या माध्यमातून इनरव्हील क्लब पनवेल तर्फे अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात आला. इनरव्हीलच्या डिस्ट्रिक्ट चेअरमन प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉक्टर शोभना पालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली चार डॉक्टर्स आणि सहा नर्सेस च्या टीमने पनवेल परिसरातील आगरी संस्थेची शाळा, तसेच दिघोडे आणि पारगाव या शाळेतील जवळजवळ २५० विद्यार्थिनींना सर्वाइकल कॅन्सर व्हॅक्सिनेशन देण्यात आले. याप्रसंगी मुलींचे पालकही उपस्थित होते . व्हॅक्सिनेशन देण्यापूर्वी सर्व विद्यार्थिनींच्या पालकांना क्लब प्रेसिडेंट डॉक्टर विणा यांनी या कॅन्सर व्हॅक्सिनेशन विषयी जागरूक करणारी व्याख्याने प्रत्येक शाळेत दिली होती. त्यामुळे पालकांनी या प्रकल्पाला भरभरून प्रतिसाद दिला. या नंतर मुलींना खाऊचे वाटप करण्यात आले. खांदा कॉलनी येथील आगरी समाज संस्थेच्या शाळेचे प्रिन्सिपल पंकज भगत आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मनीषा तांडेल यांनी याप्रसंगी इनरव्हील क्लबला जागा उपलब्ध करण्यापासून सर्वतोपरी मदत करून विद्यार्थिनींच्या आरोग्याप्रती जागरूकता दर्शविली. याप्रसंगी आगरी शाळेचा संपूर्ण महिला स्टाफ तसेच क्लब प्रेसिडेंट डॉक्टर विणा मनोहर, क्लबच्या इतर सदस्यांच्या अथक परिश्रमातून हा प्रकल्प यशस्वी झाला.

## शिवसेना पक्षात तळोजा घोट गाव परिसरातील शेकडो युवकांचा प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**




वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने, तसेच धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या शिकवणीने प्रेरित होऊन व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या व माझ्या मार्गदर्शनाखाली तळोजा शहराचे शहर प्रमुख विशाल पवार व घोटगाव चे विभाग प्रमुख आशिष हवालदार यांच्या संकल्पनेतून पनवेल विधानसभा भागातील तळोजा शहर मधल्या घोटगाव च्या युवकांनी शिवसेना मध्ये पक्ष प्रवेश केला. यावेळी रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश कार्यक्रम कळंबोली शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात संपन्न झाला. यावेळी आकाश हवालदार, कुलदीप सिंह, दीपक चव्हाण, सुशांत गाडे, जाफर अन्सारी, शहजाद शेख, पवन गुप्ता, अमित निषाद, मुकेश तायडे, श्रीनाथ मुत्तू, कवलजीत बमराह, मोहित वर्मा, रोनक परमार, स्वप्नील महाडीक, यतिन कवैतकर, सूरज सिंह, संभाजी जरग, राहुल वाघमारे, परमिंदर सिंह, मनिंदर सिंह, विलास बिन्नर, पुष्कर ठाकूर आदी तरुणांनी शिवसेनेत प्रवेश केला.





**दैनिक युवक आधार** - महाशिवरात्रीनिमित्त लोकप्रिय आ. प्रशांत ठाकूर यांनी पनवेल तालुक्यातील विविध भगवान शंकर मंदिरात जाऊन दर्शन घेतले.



युवक आधार



# संपादकीय

## २७ फेब्रुवारी जागतिक मराठी भाषा दिवस

### विषय:- जगात कुठेही जा परंतु मराठी भाषेला (मातृभाषेला) विसरू नका.


मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा असल्याचे जगजाहीर आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि.वा.शिरवाडकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने "मराठी भाषा दिवस" म्हणुन साजरा केला जातो.या दिवसाला आगळे वेगळे महत्व असुन या दीवसाला जागतिक मराठी भाषा दिवस, मराठी भाषा गौरव दिन म्हणुनही साजरा केला जातो. मराठी भाषेतील अग्रगण्य व श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समिक्षक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२रोजी पुणे येथे झाला. त्यांनी अनेक माध्यमांच्या सहाय्याने मराठी भाषेचा जगभर प्रसार करून मराठी भाषेचे नाव लौकीक केले व गौरान्वीत केले.त्यामुळेच जगातील मराठी भाषीक २७ फेब्रुवारीला "जागतिक मराठी दिवस" म्हणुन साजरा करतात.मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा आहे. मराठी भाषा सोज्वळ,निर्मळ आणि सोपी असल्याने कोणीही तीला सहज अवगत करू शकते.महाराष्ट्राची मातृभाषा ही भारतासह संपूर्ण जगाला वेगळाच आनंद प्रदान करीत असते.मराठी भाषेत महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे.याची जोपासना करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषीकांवर आहे.मराठी मांनसाचे कर्तव्य बनते की मराठी भाषा जगातील प्रत्येक मानसाच्या हृदयात व रक्तात कसे रूजवीता येईल याकडे सर्वांचे लक्ष असले पाहिजे.कारण ही मराठी भाषेची भुमी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,साधु-संत, थोर महात्मे, क्रांतीकारक, समाजसुधारक, जहालवादी, मवाळवादी यांच्या संकल्पनेतून व संस्कारातुनच मराठी भाषेचा उगम झालेला आहे. मराठी भाषेला जिवीत ठेवण्याचे काम वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी संपूर्ण ताकदीनिशी केले आणि जगभरात मराठीचा डंका वाजवीला. त्यामुळेच त्यांच्या जन्मदिनी म्हणजे २७ फेब्रुवारीला जागतिक मराठी भाषा दिवस म्हणुन साजरा केला जातो.या दिवसाला जगातील संपूर्ण मराठी भाषीक "मराठी भाषा गौरव दिवस" म्हणून साजरा करतात. आपल्या पुर्वजांनी मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी व मराठीचा ठेवा मजबूत करण्यासाठी संपूर्ण ताकद लावली.परंतु आताची नवीन पिढी मराठीचे मुळ शब्दच विसरल्याचे दिसून येते ही अत्यंत दुःखद बाब आहे. आई-बाबा, काका-काकु,मामा-मामी, आजी-आजोबा,माऊशी-माऊसा या शब्दाचा विसरपडुन मम्मी-पप्पा,अन्टी, डॅडी,ग्रॅडफादर-ग्रडमदर इत्यादी इंग्रजी शब्द मराठी भाषेत घर करतांना दिसत आहे.यामुळे मराठी भाषेतील अमृतवाणी नष्ट होवू शकते.याला नाकारता येत नाही.भारतात २८ राज्य ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. यामुळे भारताचा विचार केला तर १९५०० हुन अधिक मातृभाषा आहेत.त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेसह अनेक भाषा आहेत.त्या शिकाव्या व अवगत कराव्यात परंतु आपल्या मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी मुख्यत्वेकरून आजच्या पिढीने घेतली पाहिजे. आपल्यासाठी मराठी भाषा ही गंगेसारखी निर्मळ व तुळशीच्या वृक्षासारखी पवित्र आणि वटवृक्षासारखी अफाट भाषा आहे. त्यामुळे मराठी भाषेचा जेवढा प्रचार करतात येईल तेवढा केलाच पाहिजे. मातृभाषा मराठी ही आईची भूमिका बजावीत असते तर राष्ट्रभाषा हिंदी ही वडीलांची भुमिका पार पाडते.भारतात १९५०० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत.परंतु या संपूर्ण भाषेमध्ये सोपी,सोज्वळ,मधुर आणि सहज अवगत होणारी एकमेव भाषा म्हणजे "मराठी भाषा"त्यामुळे आजच्या नविन पिढीला मी कळकळीची विनंती करतो की आपल्या मायबोली मराठीला न विसरता त्याची जोपासना केली पाहिजे. यातच महाराष्ट्राचा आणि मराठी भाषीकांचा गौरव आहे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल असे घोषित झाले.त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनी साजरा केला जातो. मराठी भाषा महाराष्ट्रासाठीच नाही तर संपूर्ण जगाला सुशोभित करणारी भाषा आहे.मी नवीन पिढीला आग्रह करेल की कमीत कमी मराठी वृत्तपत्रे नेहमीच्या वाचनात आणावी यामुळे मराठी भाषेचा मान उंचावेल.मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला याचा अभिमान संपूर्ण मराठी माणसाला आहे. त्याचप्रमाणे मराठी भाषेला जीथे-जीथे रूजवीता येईल तीथे-तीथे रूजवुन मराठी भाषेला प्रज्वलीत करण्याचे काम आधुनिक युगात नवीन पिढीने केले पाहिजे. महाराष्ट्रातील कोणत्याही धर्माचा व्यक्ती असो किंवा पंथाचा व्यक्ती असो तो मराठीचा सन्मानच करतो आणि केला पाहिजे. परंतु मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने मराठीला जगभरात कशी सुर्यासारखी तेजस्वी करता येईल याकडे संपूर्ण मराठी भाषीकांनी लक्ष दिले पाहिजे व मराठी भाषेचे नाव सुवर्ण अक्षरात कोरल्या गेले पाहिजे.याच मराठी भाषेने पोवाडा,कीर्तन,भजन,भारूड,लावनीच्या माध्यमातून इंग्रजांना सळोकीपळो करून लावले व समाज जागृतीचे काम केले. आपण ज्या मातीत जन्म घेतला आणि ज्या भाषेच्या बळावर लहाण्याचे मोठे झालो.अशा मराठी भाषेचा प्रवास न थांबता संपूर्ण जगात झाला पाहिजे.तेव्हाच मराठी भाषेची मान आणखी उंचावेल व कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल असे मला वाटते.ज्या मातीत आपण जन्म घेतला तेथील भाषेची पुजाअर्चना व्हायलाच पाहिजे कारण ती आपणासर्वांसाठी पुज्यनीय आहे. आज दक्षिण भारतातील मातृभाषेचा विचार केला तर ती इतरांसाठी बोलायला व वाचायला अवघड व कठीण वाटते.त्यामुळे या भाषांचा प्रसार जास्त होवु शकला नाही.परंतु आज मराठी भाषा जगभरात ऐकायला व पहायला मिळते ही आनंदाची व गौरवास्पद बाब आहे.महाराष्ट्रातील मराठी भाषेचा विचार केला तर भारतातील काणा-कोपऱ्यातील व्यक्ती सहज अवगत करीत असतो. त्यामुळे देशातील इतर राज्यांतील लोक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दिसून येतात.यामुळेच मुंबईला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा मिळाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मराठी भाषा सोपी,सोज्वळ,निर्मळ आणि शांत स्वरूपाची आहे.या वैभवशाली महाराष्ट्रातील मराठी भाषा संपुर्ण जगात आकाशातील चांदण्यांसारखी चमकायला पाहिजे.मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने सर्वांना आग्रह करतो की माय मराठी,माझी मराठी, मी मराठी, मातृभाषा मराठी यापध्दतीने जोपासना व्हायलाच पाहिजे. कारण मराठी भाषा हा आपल्या पुर्वजांचा ठेवा आहे आणि ईश्वरी देण सुध्दा आहे. त्यामुळे मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त कसा करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे. कारण मराठी भाषेचा इतिहास, संस्कृती, वारसा याला उंच शिखरावर नेण्याची जबाबदारी युवा पिढीवर आहे. कारण जगात अनेक देशांमध्ये मराठी भाषा बोलली जाते. महाराष्ट्रात जर आपण फिरायला निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरावर आपल्याला मराठी भाषेचा वेगवेगळा गोडवा दिसून येतो. कारण मराठीच्या प्रत्येक शब्दात मधुरता आणि सुसंगतपणा दिसून येतो.भारतासह संपूर्ण जगात सहज आणि सोपी भाषा असेल तर फक्त "मराठी भाषा". मराठी भाषा ही महाराष्ट्राचा राष्ट्रीय पक्षी मोराचा तुर्रा आहे तर जगाचा पीसारा आहे.त्यामुळे या गोडव्यामध्ये कुठेही खींडार पडणार नाही याची जबाबदारी भारतासह जगातील संपूर्ण मराठी भाषीकांनी घेतली पाहिजे. आज जगात मराठी भाषेचा वेगळा ठसा उमटवीण्याची वेळ आली आहे. कारण आज मराठी भाषा नदीच्या प्रवाहासारखी जलदगतीने जगात प्रवेश करीत आहे व तीला समुद्रासारखे अफाट करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषीकांवर आहे. त्यामुळे मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने आपण शपथ घेवुया की मराठी भाषा जगभर पसरवीण्याकरीता आम्ही कटीबद्ध आहोत.मराठी भाषेला माझा मानाचा मुजरा.जगात वाढते प्रदुषण आणि निसर्गाचा होत असलेला ह्यास यामुळे पृथ्वीचे संतुलन दिवसेंदिवस डगमगत आहे.यामुळे भूकंप, सुनामी, अती उष्णता,अती थंडी, ग्लेशियर वितळने, समुद्राची पातळी वाढणे अशा अनेक भयावह घटना होत आहे. याला रोखण्यासाठी निसर्गाला वाचविणे अत्यंत गरजेचे आहे. याकरीता आजच्या दिवशी जगातील संपूर्ण मराठी भाषिकांनी मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील.यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल व यामध्ये आपल्याला मराठी भाषेचा वेगळाच आनंद, गोडवा व सुगंध अवश्य दिसून येईल व जगात मराठी भाषेची आगळीवेगळी प्रतीमा पहायला मिळेल आणि जगात एक चांगला संदेश जाईल.जागतीक मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !जय हिंद !

**लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**

# ग्रामपंचायत संगणक परिचालकांचे थकले मानधन, ऑक्टोबर महिन्यांपासून कुटुंबीयांचा उदरनिर्वाह उधारीवर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः-योगेश पालोदकर**

**सिल्लोडः-** सिल्लोड तालुक्यातील १०४ ग्रामपंचायत अंतर्गत १०४ संगणक परिचालकांचे मानधन गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून थकीत असल्याने त्यांच्या संसाराचा गाडा सध्या उधारीवर सुरू आहे. मानधन देताना संबंधित यंत्रणेने संगणक परिचालकांचा अंत पाहू नये असा इशारा यावेळी दिला. तसेच तातडीने मानधन खात्यावर जमा करण्याची मागणी त्यांनी केली आहे. राज्यात ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांचे मागील ऑक्टोबर महिन्यापासून कंपनीने मानधन न केल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे. दहा हजार प्रति माह तुटपुंज्या मानधनावर कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांना उपासमारीला सामोरी जाण्याची स्थिती निर्माण झाली असून उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाच्या १५ वित्त आयोग प्रकल्पांतर्गत काही वर्षांपासून



प्रशासकीय खर्चासाठी राखीव दहा टक्के निधीतून मानधन देण्यात येते. शासनाने सदरील कामासाठी एक नवीन कंत्राटदार कंपनी नियुक्त केली आहे. संगणक परिचालक यांचे वार्षिक मानधन प्रति महिना १२ हजार रुपये प्रमाणे घेण्यात येते. यापैकी फक्त दहा हजार रुपये मानधन प्रत्यक्षात दिले जाते. केंद्राकडून ग्रामपंचायतला वित्त आयोगाचा निधी प्राप्त झाल्यावर संबंधित ग्रामपंचायत त्याच्याकडे असलेल्या संगणक परिचालकांच्या मानधनाचा तेवढा निधी जिल्हा स्तरावर आरटीजीएस पद्धतीने वळती करते. त्यानंतर जिल्ह्याकडून सदर निधी राज्य शासनाकडे आणि राज्य शासनाकडून हा निधी संबंधित कंपनीकडे कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी वळता करण्यात येतो. यातून कंपनी या संगणक परिचालकांचे मानधन अदा करत असते. ऑनलाइनच्या माध्यमातून ग्रामपंचायतचे कामकाज करत असताना ग्रामस्थांना विविध प्रकारचे दाखले देणे, पत्रव्यवहार करणे, प्रस्ताव तयार करणे, लाडकी बहिणी योजना, पी.एम.किसान योजना, प्रधानमंत्री आवास योजना, माझी वसुंधरा अभियान राबवणे, आयुष्यमान कार्ड, शेतकरी आयडी, विविध शासकीय योजना गावखेड्यातील तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम संगणक परिचालक करीत असतात. अनेकदा या तरुणांना वेबसाईट दिवसा चालत नसल्याने रात्र-रात्रभर बसून शासकीय योजनांची ऑनलाईन माहिती भरण्याची काम करावे लागते. संगणक परिचालकामुळेच ग्रामपंचायत उजागर होत असते .एवढे ईमानदारीने काम करूनसुद्धा संबंधित कंपनीकडून ऑक्टोबर महिन्यापासून मानधन मिळाले नाही. यामुळे परिचालकांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अवघड झाले आहे.

**"कौटुंबिक कलहात झाली वाढ"...**

सणासुदीला सुध्दा संगणक परिचालकांना मानधन मिळत नसल्याने त्यांच्यासमोर आर्थिक समस्या निर्माण झाली आहे. यातून कौटुंबिक कलह वाढल्याचे दिसून येते. गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून मानधन नसल्यामुळे उदरनिर्वाह कसा करायचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. महागाई आकाशाला भिडल्यामुळे घर चालवणे कठीण झाले आहे. त्यामुळे तणावाची स्थिती असून पती पत्नी मधील भांडण ही विकोपाला जात असल्याचे दिसून येत आहे.

चालू आठवड्यात जर मानधन मिळाले नाही तर राज्य संघटनेच्या आदेशानुसार सिल्लोड तालुक्याच्या ग्रामपंचायतीचे ऑनलाईन कामकाज बंद करणार.

**सद्दाम हुसैन मुलतानी**
**तालुकाध्यक्षः- संगणक परिचालक कर्मचारी संघटना**

# महाकुंभमेळ्यात रायगडच्या पितापुत्रांची गायनसेवा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

ज्ञानोबा तुकारामाच्या गजरात रिंगण, टाळ-मृदंगाच्या गजरातील दिंडी सोहळा... कीर्तनातून हरिजागर... अन् ज्ञानेश्वरी पारायणाचा उद्‌घोष... अशा भक्तिमय वातावरणात प्रयागराज येथे महाकुंभमेळ्यात ज्ञानेश्वरी भव्य सामुदायिक पारायण आणि अखंड हरिनाम महोत्सव मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. या महोत्सवात रायगड जिल्ह्याचे सुपुत्र हरी भक्त पारायण भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी आणि त्याचे चिरंजीव पंडित उमेश चौधरी यांनी बालयोगी सदानंदबाबा यांच्या प्रमुख उपस्थितीत संगीत सेवा दिली. यावेळी हरिनामाच्या गजराने प्रयागराज येथील त्रिवेणी संगमाला जणू चंद्रभागेचे रूप आले होते. कुंभमेळ्याचे औचित्य साधून तुंगारेश्वर येथील बालयोगी श्री सदानंद महाराज आश्रमाच्या वतीने हिंदी ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित केला होता. प्रयागराज येथील सेक्टर नऊमध्ये झालेल्या या सप्ताहात काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, कथा, भजन तसेच कीर्तने झाली. ज्ञानेश्वरी पारायणास अडीच हजार भाविक बसले होते. या महोत्सवात सुप्रसिद्ध भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी आणि त्यांचे चिरंजीव पं. उमेश चौधरी यांनी भजन सादर करत वातावरण




भक्तिमय केले होते. त्यांना पखवाजवर निलेश पाटील तर गायन साथ नारायणबुवा पाटील व गोपीनाथ महाराज यांनी साथ दिली. या सप्ताहात सप्ताहात योगीराज महाराज गोसावी, विश्वनाथ महाराज वारिंगे, विजय महाराज जगताप, प्रल्हाद महाराज शास्त्री, राजेंद्र महाराज दहिभाते, जगन्नाथ महाराज पाटील, सर्वेश्रीताई महाराज यांची कीर्तने झाली. तुकाराम महाराज शास्त्री यांच्या काल्याचे कीर्तन झाले. तुकाराम महाराज शास्त्री यांनी रामकथेवर निरूपण केले. बालयोगी श्री सदानंद महाराजांच्या भक्तांनी ज्ञानोबा तुकारामाचा जयघोष करीत दिंडी सोहळा काढला. या वेळी उपस्थित भाविकांनी डोक्यावर ज्ञानेश्वरी घेऊन ज्ञानोबा-तुकारामांचा गजर करीत रिंगण घातले.यावेळी वारकरी सांप्रदायिक गजराने त्रिवेणी संगमाचा परिसर दणाणून गेला.

# मंठा शहरात भव्य आदीयोगी (महादेव) मूर्ती स्थापना

## शिवालय प्राईड भव्य प्लॉटिंग शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - नामदेव मंडपे**
**मंठा जालना**

मंठा शहरात महाशिवरात्रीच्या पाश्वभूमीवर भव्य दिव्य अशी आदियोगी (महादेव ) मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी शिवालय प्राईड च्या संयुक्त विद्यमाने भव्य प्लॉटिंग चा शुभारंभ व महाप्रसादाचे आयोजन मंठा शहराचे मा.नगराध्यक्ष तथा विद्यमान न.प. गटनेते नितीन राठोड यांच्या पुढाकाराने व्यवस्थापक अविनाश खांडेकर, अनुप आबड,ओमप्रकाश पेरे ,सचिन जैवळ, मयूर गोरे यांच्या प्रमुख सहकाऱ्याने भव्य दिव्य कार्यक्रम सोहळा पार पडला या कार्यक्रमास माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनरावजी लोणीकर यांनी भेट दिली श्री आदियोगी चे दर्शन घेऊन नितीन राठोड यांना आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या व मनमोहक , आकर्षक अश्या आदियोगी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्या बद्दल विशेष कौतुक केले शिवालय प्राईड चे आयोजक व व्यवस्थापक यांच्या हस्ते आमदार लोणीकर यांचा स्वागत सत्कार यावेळी करण्यात आला. या भव्य दिव्य सोहळ्यास विधानपरिषद सदस्य आ.राजेश राठोड, नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे,उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे,जि.प.सदस्य पंजाब बोराडे, नगरसेवक शेख साजीद, नगरसेवक सचिन बोराडे,नगरसेवक शेषनारायण दवणे, नगरसेवक विकास सुर्यवंशी,नगरसेवक राजेश खंदारे,मा. उपनगराध्यक्ष जे.के भाई कुरेशी,नगरसेवक बाज पठाण,नगरसेवक प्रल्हादराव बोराडे, यांच्यासह मोठ्या संख्येने परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.



# दौलत कामथे यांचे अल्पशा आजाराने निधन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**



आंगरआळीमधील सामाजिक कार्यकर्ते तसेच नावाजलेले इलेक्ट्रीशियन दौलत जानू कामथे यांचे वयाच्या 65 व्या वर्षी गुरुवार 20 फेब्रुवारी रोजी रात्री 8.15 च्या दरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. अतिशय शांत, मनमिळाऊ, स्वभावाच्या दौलत कामथे यांच्या पार्थिवावर शुक्रवार 21 फेब्रुवारी सकाळी येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मंदा कामथे या पत्नी,राकेश हा मुलगा,वैशाली वाळंज व नितू जगताप या दोन विवाहित मुली तसेच सून,जावई,नातवंडे असा परिवार आहे.त्यांचे दशक्रिया विधी शनिवार 01 मार्च रोजी उद्धर -पाली तर उत्तरकार्य मंगळवार 04 मार्च रोजी आंगरआळी येथिल राहत्या घरी होणार असल्याची माहिती कामथे कुटुंबियांनी दिली.

# दारुच्या बाटल्या, महिलांच्या साड्या, कंडोम, पुण्यातील बंद पडलेल्या शिवशाही बसमध्ये आणखी काय आढळलं ?

**दैनिक युवक आधार**
**स्वारगेट वार्ताहर**

बसस्थानकात २६ वर्षीय तरुणीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर शिवसेना (Uddhav Thackeray's Shiv Sena) आक्रमक झाली आहे. माजी नगरसेवक वसंत मोरे (Vasant More) यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी बसस्थानकात धडक देत सुरक्षा रक्षकांच्या केबिनची तोडफोड केली. बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर आक्षेपार्ह वस्तू आढळल्याने, येथे सुरक्षेच्या नावाखाली गंभीर प्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### स्वारगेट बसस्थानकात सुरक्षेचा अभाव?

वसंत मोरे यांनी थेट सुरक्षा रक्षकांवरच गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते, बसस्थानकात २० सुरक्षा रक्षक असूनही अशा घटना घडतात, याचा अर्थ ते स्वतः या प्रकारात सामील आहेत. ते म्हणाले की, सुरक्षा रक्षकांची संमती असल्याशिवाय अशा घटना घडू शकत नाहीत. बंद असलेल्या शिवशाही बसमध्ये मोठ्या प्रमाणावर कंडोम्स, महिलांच्या साड्या, अंतर्वस्त्र, मद्याच्या बाटल्या आणि बेडशीट सापडल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे येथे केवळ एकच घटना नाही, तर सतत असे प्रकार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला.

शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, बसस्थानकात घुसून सुरक्षा रक्षकांची केबिन फोडली. त्यांच्या म्हणण्यानुसार, जर सुरक्षा रक्षक काही करत नसतील, तर त्यांची केबिन इथे असण्याची गरजच नाही.

### आगारप्रमुख आणि परिवहन मंत्री जबाबदार?

वसंत मोरे यांनी थेट एसटी आगारप्रमुख आणि परिवहन मंत्र्यांवरही (Transport Minister) सवाल उपस्थित केले आहेत. सुरक्षा रक्षक मोठ्या संख्येने उपस्थित असतानाही, अत्याचारासारख्या घटना घडत असतील, तर हे प्रशासनाच्या निष्क्रियतेचे लक्षण असल्याचे त्यांनी म्हटले.

या घटनेबाबत आगारप्रमुख अनभिज्ञ असल्याचे सांगण्यात आले, त्यावर आक्रमक होत वसंत मोरे यांनी कारवाईची मागणी केली. जर सुरक्षा रक्षक आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई झाली नाही, तर कायदा हातात घेण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने मधून 23 हजार पेक्षा जास्त बहिणींना डच्चू.

**राज्य स्तरीय यत्राने कडून लाडकी बहीण योजने मधील निकष पूर्ण न करणाऱ्या बहिणींना मिळत आहे डच्चू.**

**दैनिक युवक आधार**
**अमरावती विभागीय संपादक**

**संदीप मापारी पाटील(लोणार):-**महाराष्ट्र शासनाने विधानसभा निवडणुकी पूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली ज्या योजनेला अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला बुलढाणा जिल्हात 6 लाख 71 हजार 183 अर्ज भरल्या गेले मात्र अत्ता या लाडक्या बहिणी मधून पात्र लाडक्या बहिणीं वगळता अपात्र लाडक्या बहिणींना वागळले जात असून ही प्रक्रिया राज्यस्तरावरून होत आहे ज्यात बुलढाणा जिल्हातील हजारो लाडक्या बहिणी फेब्रुवारी महिन्यात मिळणाऱ्या लाभा पासून वंचित राहणार. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्र राज्य शासनाने जुलै २०२४ मध्ये महिलांसाठी सुरू केलेली एक योजना आहे. महाराष्ट्र राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी लाडकी बहीण योजना सुरू करण्यास महाराष्ट्र शासनाने २८ जून २०२४ रोजी मान्यता दिली होती त्या नुसार बुलढाणा जिल्हातील 13 तालुक्या मधील 6 लाख 71 हजार 183 बहिणींनी अर्ज भरले होते ज्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला मात्र शासनाने अत्ता या योजने मध्ये अटी पूर्ण न करणाऱ्या बहिणींना कात्री लावत त्यांचे लाभ बंद केले असून 23 हजार 778 लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या ज्यात बुलढाणा अर्ज भरलेले 72,086 राहिलेल्या 70,055 अपात्र झालेले 2,031 चिखली अर्ज भरलेले 72,610 राहिलेल्या 70,110 अपात्र झालेले 2,500 दे राजा अर्ज भरलेले 30,507 राहिलेल्या 29,468 अपात्र झाल्या 1,039 जळगांव जामोद अर्ज भरलेल्या 39,989 राहिलेल्या 39.015 अपात्र झालेल्या 974 खामगाव अर्ज भरलेल्या 84,326 राहिलेल्या 81,679 अपात्र ठरलेल्या 2,647 लोणार अर्ज भरलेल्या 39,456 राहिलेल्या 36,853 अपात्र ठरलेल्या 2,603 मलकापूर अर्ज भरलेल्या 44,093 राहिलेल्या 42,709 अपात्र ठरल्या 1,384 मेहकर अर्ज भरलेल्या 72,130 राहिलेल्या 69,206 अपात्र झाल्या 2,924 मोताळा अर्ज भरलेल्या 41,985 राहिलेल्या 40,352 अपात्र झाल्या 1,633 नांदुरा अर्ज भरलेल्या 47,473 राहिलेल्या 45,859 अपात्र झाल्या 1,614 संग्रामपूर अर्ज भरलेल्या 38,084 राहिलेल्या 36,765 अपात्र झाल्या 1,319 शेगाव अर्ज भरलेल्या 40,936 राहिलेल्या 39,565 अपात्र झाल्या 1,371 ,सिंदखेड राजा तालुक्यात अर्ज भरलेल्या 47,508 राहिल्या 45,769 अपात्र झाल्या 1,739 अत्ता येणारा फेब्रुवारीचा हफ्ता या अपात्र महिलांना मिळणार नाही. ( धनाड्य चारचाकी गाडी असणाऱ्या महिला, शासनाच्या इतर योजनाचा लाभ घेणाऱ्या महिला,ज्यांचे उत्पन्न 2.5 लाखा पेक्षा जास्त आहे, नोकरदार, टॅक्स भरणाऱ्या, ज्यांचे पती सरकारी नोकरीवर आहेत, ज्या महिलांचे वय 65 वर्षा पेक्षा जास्त झाले अश्या महिलांचे राज्य स्तरावरून नावे कमी झाली तर दर महिन्याला 65 वर्षा पेक्षा जास्त वय असणाऱ्या महिलांचे नावे सिस्टम मधून आपोआप कमी होतील ) ( सरकारी नोकरीं, टॅक्स भरणारे, सरकारी नोकरदार पतीची पत्नी अश्या 94 महिलांनी स्वतःहून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ नाकारला )

# इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकीप्रकरणी कठोर कारवाईची मागणीः दोषींवर त्वरित गुन्हा दाखल करावा

**प्रा.पंढरी दत्तराव पाठे यांचा इशारा**

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**
**यवतमाळ, - दि.25 फेब्रुवारी.**

प्रख्यात इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेऊन एका अनोळखी व्यक्तीने फोनवरून दिलेल्या धमकीमुळे मोठा खळबळजनक प्रकार उघड झाला आहे. या संभाषणादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबाबत अपमानकारक वक्तव्ये करण्यात आली,ज्यामुळे जनमानसात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर त्वरित गुन्हा दाखल करावा,अशी मागणी प्रा.पंढरी पाठे यांनी केली आहे.त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की,छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अपमान करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही. प्रा. पाठे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची मागणी शासनाकडे केली असून,इंद्रजित सावंत यांना त्वरित पोलीस संरक्षण देण्यात यावे,अशी ठाम भूमिका मांडली आहे.



जर या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई झाली नाही,तर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.महाराष्ट्रातील जनतेच्या भावना दुखावल्याने या प्रकरणाकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# कीर्तन: रुपेरी पडद्यावर इतिहास घडवणारा भव्य चित्रपट !

## दिग्दर्शक अतुल जगदाळे लवकरच घोषणा करण्याच्या तयारीत!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, (प्रतिनिधी) :** ग्लॅमरस आणि मनोरंजनप्रधान विषयांपासून वेगळ्या वाटेवरचा एक अनोखा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे! मराठी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले दिग्दर्शक अतुल जगदाळे यांच्या 'कीर्तन' या आगामी चित्रपटाविषयी सध्या चित्रपटसृष्टीत विशेष चर्चा सुरु असल्याचे ऐकिवात येत आहे. महाराष्ट्राच्या संतपरंपरेवर आधारित हा भव्यदिव्य चित्रपट प्रेक्षकांना वेगळ्या विश्वात घेऊन जाईल असे जाणकार सांगत आहेत. या चित्रपटाची निर्मिती 'अतुल जगदाळे प्रॉडक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या बॅनरखाली होत असून, तो आतापासूनच उत्कंठतेचा विषय ठरला आहे.

**अध्यात्म – एक नवा प्रयोग!**
'कीर्तन' हा चित्रपट केवळ संतपरंपरेवर आधारित धार्मिक चित्रपट नसून, त्याला एक भव्य दृष्टीकोन देण्यात आला आहे. कीर्तनकारांच्या जीवनावर प्रकाश टाकत, त्यामधील संघर्ष आणि समाजप्रबोधनाचे महत्त्व उलगडण्याचा प्रयत्न या चित्रपटातून होणार आहे. भव्य सेट्स, अप्रतिम छायांकन आणि दमदार कथा यामुळे हा चित्रपट केवळ इतिहास नव्हे, तर समकालीन रसिकांसाठीही एक मंत्रमुग्ध करणारा अनुभव असणार आहे.

**कलावंत कोण असतील? संगीत कोणाचे? – उत्सुकता वाढली!**
'कीर्तन' म्हटलं कि ओघाने संगीत-



लोकसंगीत आलंच. त्यामळे चित्रपटसृष्टीत सध्या सर्वाधिक चर्चेत असलेला प्रश्न म्हणजे 'कीर्तन' चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाची धुरा कोणाच्या हाती असणार? या विषयाला अत्यंत प्रभावी आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या सुरांची नस जाणणाऱ्या प्रतिभावंत संगीतकारांपैकी नेमकी कोणाकडे ही धुरा सुपूर्द होणार? कीर्तनात कोणत्या गायकांचा स्वर तल्लीन करणार? या चर्चांना उधाण आले आहे. तसेच या भव्य चित्रपटात कोणकोणत्या दिग्गज कलावंतांची वर्णी लागणार आहे याविषयीसुद्धा कमालीचे औत्सुक्य आहे. निर्माते-दिग्दर्शक अतुल जगदाळे यांनी यासंदर्भात गुप्तता राखली असली, तरी 'लवकरच मोठी घोषणा होईल' असे त्यांनी संकेत दिले आहेत. त्यामुळे चित्रपटप्रेमींच्या उत्कंठेला आणखी उधाण आले आहे.

**'गणवेश'च्या यशानंतर नवा प्रयोग!**
'गणवेश' या सामाजिक आशयाच्या चित्रपटानंतर तीन- चार वर्षांपासून अतुल जगदाळे यांनी एका भव्य दिव्य हिंदी चित्रपटावर काम सुरु केले आहे. त्यासोबत त्यांनी आपल्या मातृभाषेतील कलाकृतीलाही विशेष प्राधान्य देत मराठी माणसाला प्रिय असलेले 'कीर्तन' भव्य रुपेरी पडद्यावर सादर करण्याचा प्रयोग करत आहेत. अतुल जगदाळे यांना कलावंत तंत्रज्ञ निवडीची अचूक जाण आहे. त्यांच्या 'गणवेश' मध्ये दिलीप प्रभावळकर, मुक्ता बर्वे, किशोर कदम, स्मिता तांबे यांसारख्या दिग्गज कलाकारांनी भूमिका साकारल्या होत्या. त्यामुळे 'कीर्तन' मध्ये कोणती स्टारकास्ट असणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




# लिंबागणेश येथे डीजे मुक्त शिवजयंती साजरी...

### शिवजयंती निमित्त क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले लिखित "तृतीय रत्न" महानाट्य सादर.

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे रयतेचे राजे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव निमित्त रविवार आणि सोमवार असे दोन दिवशीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मागील ३ वर्षांपासून लिंबागणेश येथे डीजे मुक्त तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातुन शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येतो. रविवारी ( दि.२३ फेब्रुवारी) रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले लिखित "तृतीय रत्न" महानाटकाचे आयोजन करण्यात आले होते. लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रा.लेनाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून भालचंद्र विद्यालयातील इ. ८ वी, ९ वी च्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी नाटक सादर केले. या नाटकास ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दुसऱ्या दिवशी सोमवार दि.२४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. सजवलेल्या रथातून छत्रपती शिवरायांची प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली विशेष आकर्षण म्हणून संगमेश्वर हलगी पथक कुर्ला बीड, तसेच खालसा स्पोर्ट अकॅडमी पाटोदा यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके आणि लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयातील ढोल पथक आणि लेझीम पथकाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. या साठी शाळेचे शिक्षक सचिन वाणी यांनी विशेष परिश्रम घेतले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपले योगदान दिले. या वेळी शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

#### परत एकदा गाजणार चिखली शहरामध्ये क्रिकेटचा थरार

## क्रिकेट प्रेमींना लागली परत एकदा नागसेन प्रियीमियर लिगच्या सामन्यांची ओढ

**दैनिक युवक आधार**
**बुलढाणा प्रतिनिधी**
चिखली शहरामध्ये युवा संवर्धन समिती अंतर्गत दरवर्षी एन.पी.एल. नागसेन क्रिकेट प्रियीमीय लिगचे आयोजन करण्यात येते. मागील वर्षी सन २०२४ मध्ये एन.पी.एल. चे आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये चिखली तालुक्यातील नामांकीत क्रिकेट स्पर्धक यांनी सहभाग घेतला होता. क्रिकेटचा रोमांच काय असते हे या समितीने त्यांच्या आयोजनामधून दाखवून दिला होता. सर्व क्रिकेट प्रेमींनी संवर्धन समितीची वाहवाह केली होती. तोच रोमांच घेऊन समितीने यावर्षी सुध्दा आयोजनाची सुरुवात केली आहे. यांसबंधी कालच संवर्धन समितीची बैठक संपन्न झाली, त्यामुळे परत एकदा एन.पी.एल. २०२५ चे चित्तथराराक क्रिकेटचे सामने चिखली वासीयांना बघायला मिळणार आहे. युवा संवर्धन समिती मध्ये मा. सचिन साळवे सर, सुमेध जाधव सर, अभिजय साळवे सर, राहुल पवार सर, सिद्धार्थ धदरे, रामदास जाधव, विश्वनाथ जाधव, पँथर राजेश बोर्डे, व इतर मान्यवर उपस्थित होते.




## खासदार अजितजी गोपछडे यांच्या पुढाकारातून रुग्णाला मिळाली तीन लाखाची आर्थिक मदत

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
**नांदेड :** जिल्ह्याच्या शाश्वत विकासाची पायाभरणी करण्यासाठी अहोरात्र कष्ट घेणारे खा. डॉ. अजित गोपछडे, यांच्या पुढाकारातून मुखेड तालुक्यातील धनज चोंडी येथील एका रुग्णाला उपचारासाठी पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधीतून तब्बल तीन लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात झाली आहे. मुखेड तालुक्यातील चोंडी धनज येथील, गंगाधर गणपती पाटील, यांना कर्करोगाचा आजार झाला आहे. त्यांच्या कॅन्सर या आजारावर हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. उपचारासाठी त्यांना आर्थिक अडचणी आल्याने त्यांनी खा. डॉ. अजित गोपछडे, यांच्याकडे पंतप्रधान सहाय्यता निधीतून मदत मिळावी यासाठी विनंती केली होती खा. डॉ. गोपछडे, यांनी गंगाधर पाटील, यांच्या उपचारासाठी पंतप्रधान प्रधानमंत्री राष्ट्रीय सहाय्यता निधीतून तीन लाख रुपये मिळवून देण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. निधी मंजूर झाल्याचे पत्र आज गंगाधर पाटील, यांना आणि हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटलच्या प्रशासनाला पाठविण्यात आले आहे. त्यामुळे खा. डॉ.अजित गोपछडे, यांच्या प्रयत्नाने एका रुग्णाचे प्राण वाचविण्यासाठी मोठी मदत होत असल्याने त्यांचे आभार व्यक्त केले जात आहेत

# अनंत पार्क सोसायटी प्रकरण, रहिवाशांना बेघर होऊ देणार नाही

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन..

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव - वार्ताहर**
दिवा शहरातील १८ वर्ष जुन्या अनंत पार्क या रहिवासी सोसायटीवर उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर महापालिकेने कारवाईचा बडगा उगारल्यानंतर रहिवासी चांगलेच आक्रमक झाले असून कारवाईसाठी आलेल्या महानगर पालिकेच्या पथकाला रहिवाशांनी रस्त्यावर आंदोलन करून माघारी परतवलं होत. बेघर व्हावं लागणार असल्याने रहिवासी चांगलेच हवालदिल झाल्याने आज रहिवाशांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मंत्रालयात जाऊन भेट घेतली. अनंत पार्क सोसायटीला नोटीस आल्यापासून शिवसेना या रहिवाशांसोबत आहे. काल महापालिकेला विरोध करण्यासाठी शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वात सर्व शिवसैनिक रस्त्यावर उतरून महापालिकेच्या कारवाईला विरोध दर्शवला होता यावेळी खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी कारवाई साठी आलेल्या अधिकाऱ्यांशी फोन वर चर्चा केल्यानंतर अखेर पालिकेला कारवाई थांबवावी लागली. १८ वर्ष जुन्या अनंत पार्क सोसायटी संदर्भात कायदेशीर मार्ग काढण्याचं काम सुरू असून एकही रहिवाशाला बेघर होऊ देणार नसल्याचे आश्वासन यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज उपस्थित



रहिवाशांना दिले. यावेळी शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी, उपशहरप्रमुख, नगरसेवक शैलेश पाटील, उपशहरप्रमुख अँड आदेश भगत, गणेश मुंडे, नगरसेवक अमर पाटील, दीपक जाधव, विभागप्रमुख उमेश भगत, चरणदास म्हात्रे, विनोद मढवी, निलेश पाटील, शशिकांत पाटील, जगदीश भंडारी, अरुण म्हात्रे, सचिन चौबे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवगंगा वाटर पार्क येथे शिवधाम व शिवदर्शन सेवा समिति भव्य महाशिवरात्रि उत्सव

### शिवकी महिमा विश्वकल्याण करे जन्मभूमी ओर कर्मभूमी से कार्य लोकसेवा का भाग्य मिले..पंडित दिनेश शुक्ला




**दैनिक युवक आधार**
**पनवेल/सोमटने**
श्री.राम जन्मभूमी व महाराष्ट्र कर्म भूमीतून अधिकांश मनावर राज्य करणारे श्री. काशी विश्वनाथ चे महापंडित शिवभक्त अवध नारायण शुक्ला व त्यांच्या लोकसेवेचा वारसा पुढे भक्ती भावाने चालवणारे सुपुत्र दिनेश शुक्ला यांच्या अनेक वर्षांच्या परंपरागत सनातन धर्म श्रद्धेच्या संकल्पनेतून शिवधाम व शिवदर्शन सेवा समिती च्या वतीने दरवर्षीप्रमाणे तीन दिवसीय भव्य महाशिवरात्रि उत्सव मोठ्या जल्लोषात साजरी केली जाते. हा शिव महोत्सव शिवधाम सोमटणे पनवेल शिवगंगा वाटर पार्क व रिसॉर्ट मध्ये मोठ्या भक्ती भावाने व सुंदर देवी देवतांच्या चलचित्र मूर्तींच्या प्रतिकृतीने भव्य दिव्य असा सजविला जात असल्याने रायगड जिल्ह्यातील हजारो शिवभक्तांची शिव दर्शनासाठी मोठी गर्दी पाहायला मिळते. यावेळी अखंड श्री राम चरित्र, आरती,भजन,हवन, गौ सेवा ,भंडारा तसेच हजारो लोकांच्या बसण्या उठण्याची उपासाच्या खाण्या पिण्याची महाप्रसादाची सुंदर व्यवस्था केलेली असते.या सेवा कार्यात शिवगंगा वॉटर पार्क कर्मचारी व स्वतः शुक्ला मित्र परिवार तसेच स्थानिक पोलीस प्रशासन उपस्थित असतात. समितीचे विश्वस्त शिवभक्त पंडित दिनेश अवध नारायण शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली कुलदीप दुबे ,अशोक गोस्वामी ,आशिष सिंग, आलोक सिंग ,मनोज जोशी व व्यवस्थापन कर्मचारी या सेवेत विशेष सहभाग घेत असतात.

# म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनच्यावतीने अध्यक्ष ॲड. सुरेशजी ठाकूर आणि उरण मधील पत्रकार जाहीर सत्कार

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**
महाराष्ट्रातील नगरपरिषदा, नगरपंचायती आणि महानगरपालिकांमधील सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड बर्वे कमिटीच्या शिफारशी नुसार औरंगाबाद खंडपीठाचा महत्वपूर्ण निर्णय आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार श्री.मनोज रानडे साहेब आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई यांनी सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत आदेश काढल्याने हजारो,लाखो सफाई कर्मचाऱ्यांचा नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. याकामी ज्या ज्या व्यक्तींचे सहकार्य लाभले त्यासर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्या साठी आणि हा आनंद व्दिगुणीत करण्या साठी संघर्ष समिती आणि म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन आणि लाभार्थी कामगार यांच्या वतीने दि.25 फेब्रुवारी 2025 रोजी जेष्ठ विधीज्ञ तथा म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेशजी ठाकूर आणि उरण मधील पत्रकार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. उरण नगरपरिषदेच्या भव्यप्रांगणात संपन्न झालेल्या सोहळ्या साठी म्युनिसिपल



एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेशजी ठाकूर.उपाध्यक्ष संतोष पवार,सरचिटणीस अनिल जाधव.उरण युनिटचे अध्यक्ष हरेश,जाधव,कार्याध्यक्ष मधुकर भोईर,सरचिटणीस नरेंद्र उभारे,उपाध्यक्ष धनेश कासारे,उपाध्यक्ष महेंद्र साळवी. अड. योगिता म्हात्रे उरणातील जेष्ठ पत्रकार,प्रदीप पाटील.जेष्ठपत्रकार प्रवीण पुरव(मंत्रालय पत्रकार कक्ष),संजय गायकवाड जेष्ठ पत्रकार तथा संपादक निर्भीड शोध,जीवनकेणी अध्यक्ष उरण तालुका दैनिक पत्रकार संघ,दिनेश पवार उपाध्यक्ष उरण तालुका दैनिक पत्रकार संघ.रमेश थळी,विठ्ठल ममताबदे,पंकज ठाकूर.मिलिंद खारपाटील,सुभाष कडू,शेखर म्हात्रे,प्रवीण पाटील हेमंत देशमुख आणि सुयोग गायकवाड आदि पत्रकारान समवेत लाभार्थी सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटनेचे उपाध्यक्ष संतोष पवार यांनी महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषद नगरपंचायत आणि महानगर पालिकांमध्ये सन 1972 पासून लाड व पागे समितीच्या शिफारशी बाबत सविस्तरपणे महिती सांगूनआपल्या युनिंच्या ताकतीवर आपण हा प्रश्न मार्गी लावला असल्याचे सागून कोणत्याही विधायक न्याय हक्काच्यानिर्णयाची निर्मिती उरण मधूनच होत असल्याचे ते म्हणाले. उरणातील उपस्थित पत्रकाररांबरोबर जे नेहमीच आम्हाला सहकार्य करणारे उरण पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री घनःश्याम कडू, पत्रकार श्री जगदीश तांडेल, पत्रकार श्री विरेश मोडखरकर , पत्रकार श्री अजित पाटील ह्यांनी पुर्व नियोजित कार्यक्रमामुळे उपस्थित राहू शकले नाही तसेच उरण व्यतिरिक्त राज्यातील विविध विभागांतील पत्रकारांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळेच राज्यातील कामगार कर्मचार्यांना न्याय मिळत असतो हे म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे कार्याध्यक्ष श्री संतोष पवार यांनी नम्र पणे नमूद केले. तर यावेळी प्रदीप पाटील. प्रवीण पुरव,दिनेश पाटील यांनी उरणआणि कामगारांच्या विविध समस्यांबाबतचा उहापोह करून कामगाररांची संघटीतशक्ती आपलान्याय हाक्कमिळवू शकते त्यानुळे भविष्यात कामगारांनी संघटीत राहाण्याचे आह्वान केले कारण आजकाल कामगारक्षेत्रात सुरु असणारी ठेकेदारीची पद्धत कामगारांना हानी कारक असल्याचे सांगितले कामगार चळवळी समोर आलेली आव्हानांवर एकजूटीने मुकाबला करण्याची आवश्यकता आहे. असे मत व्यक्त समाजाला उत्तम आरोग्य देणार्या सफाई कामगारांचे कौतूक केले. तर कार्यक्रमाच्या शेवटी आपले मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ कामगार नेते तथा म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अड सुरेश ठाकूर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले कामगार , कष्टकरी वर्गासाठी या देशाचे माजी संरक्षणमंत्री ज्येष्ठ कामगार नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी आम्हाला दिलेली शिकवण पुढील कार्यकर्त्यांना देणे हेच काम अधिक मोठ्या प्रमाणात कामगार वर्गाचे कामगार चळवळी संदर्भात प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. तर आणि तरच कामगार वर्गाचे अस्तित्व टिकणार आपण सर्व मिळून खाजगीकरण , जागतिकीकरण, उदारीकरण याचा अभ्यास करण्याची , यांच्या दुष्परिणामांचा पुन्हा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे असे सांगतात आम्ही सर्व मिळून प्रयत्न करुया असे सांगून आयोजकांचे आभार मानले. शेवटीजेष्ठ पत्रकार प्रदीप पाटील यांच्या हस्ते नियोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अड सुरेश ठाकूर यांचा शाल, गुलाबाचे झाड व छत्रपतीशिवाजी महाराज्यांच्याप्रतिमेची फोटोफ्रेम देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला, त्याच बरोबरीने वरील उपस्थित उरणातील पत्रकारांना अड. सुरेश ठाकूर यांच्या हस्ते शाल, गुलाबाचे झाड व छत्रपतीशिवाजी महाराज्यांच्याप्रतिमेची फोटोफ्रेम देऊन कर्तव्यदक्षपत्रकार म्हणून संन्मानीत करण्यात आले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कामगार नेते मधुकर भोईर, हरेश जाधव,रमेश कांबळे , नरेंद्र उभारे , धनेश कासारे, महेंद्र साळवी, माधव सिद्धेश्वरे आणि सर्व उरण नगरपरिषदेमधील सफाई कर्मचारी आणि त्यांचे वारस यांनी प्रचंड मेहनत घेतली.

# घाटंजी तालुक्यातील कुर्ली येथे गोंडी ढेमसा स्पर्धा : सांस्कृतिक जादूचा अनुभव!

**संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी ढेमसा स्पर्धा! १ मार्च २०२५ रोजी. आकाश आत्राम यांनी आयोजित केलेली ही स्पर्धा एक भव्य कार्यक्रम असेल.**

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**
**घाटंजी -** गोंड समुदायाच्या समृद्ध सांस्कृतिक वारसा चा एक उत्साही उत्सव, गोंडी ढेमसा स्पर्धा, १ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ७ वाजता, घाटंजी तालुक्यातील कुर्ली या रमणीय आदिवासी बहुल गावात होणार आहे. या उल्लेखनीय कार्यक्रमाचा उद्देश गोंड समुदायाच्या पारंपारिक लोककला प्रकारांचे, विशेषतः मंत्रमुग्ध करणाऱ्या ढेमसा नृत्याचे, त्यांच्या अनुरूप सह पोशाखांसह आणि मधुर वाद्यांचे जतन करणेच नाही तर त्यांना पुनरुज्जीवित करणे आहे, या आपल्या वेगाने डिजिटल होत असलेल्या जगात लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.



*तेलंगणा राज्याचे ग्रामीण विकास मंत्री मा.श्रीमती.धनश्री अनुसया ( सितक्का ) , माजी मंत्री मा. श्री . शिवाजीराव मोघे , चंद्रपूर मतदार क्षेत्र खासदार. मा. श्रीमती. प्रतिभाताई धानोरकर , आर्णी केळापूर मतदार संघ. आमदार, मा. श्री. रजुभाऊ तोडसाम, किनवट माहूर मतदार संघ. मा. श्री. भीमरावजी केराम, खाणापूर मतदार संघ , तेलंगाना राज्य. मा. श्री वेडमा बोज्जू पटेल, राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य.मा. श्री इंद्रनील नाईक, यांच्यासह आदरणीय पाहुणे या कार्यक्रमाची शोभा वाढवतील. तेलंगणातील प्रसिद्ध गोंडी गायकांच्या उपस्थितीमुळे वातावरण अधिक समृद्ध होईल, गोंड संस्कृतीच्या आत्म्याचे प्रतिबिंबित करणारे संगीत आणि नृत्याचे एक टेपेस्ट्री तयार होईल.

**सहभागी होणार यांच्या प्रभावी बक्षीसासाठी स्पर्धा करतील.**

१ लाख रुपये, विविध ढेमसा गटांना त्यांची प्रतिभा आणि सर्जन शीलता प्रदर्शित करण्यास प्रेरित करण्यासाठी डिझाइन केलेले एक उदार प्रोत्साहन. पारंपारिक कलांमध्ये रस पुनरुज्जीवित होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी या कार्यक्रमाचे महत्त्व या महत्त्वपूर्ण बक्षीसातून अधोरेखित होते.

जलद बदलाच्या युगात आपला सांस्कृतिक वारसा जपण्याची निकड अधोरेखित करून, आयोजक - आकाश आत्राम, सरपंच , सतीश रेड्डी गड्डमवार , आणि आयोजन समितीचे अध्यक्ष दीपक सिडाम, यांनी ढेमसा गटांना पुढे येऊन मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. हे आवाहन धेम्साच्या चैतन्यशील आत्म्याला येणाऱ्या पिढ्यांसाठी सतत बहरत राहावे यासाठी, त्यांच्या अद्वितीय सांस्कृतिक ओळखीचे रक्षण आणि संवर्धन करण्याची सामूहिक जबाबदारीवर भर देते. सामुदायिक भावनेचा मेळावा आणि आपल्या सतत विकसित होत असलेल्या जगात सांस्कृतिक महत्त्व लक्षात आणून देणारा हा असाधारण कार्यक्रम साजरा करण्यासाठी आमच्यात सामील व्हा.!

# सणसर येथे महाशिवरात्रीला सोनारमळ्यात घेतला फराळाचा आस्वाद



**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**
इंदापूर तालुक्यातील सणसर गावाच्या परिसरात पुरातन काळातील महादेव मंदिर म्हणून प्रसिद्ध असलेले सोनारमळ्यातील महादेवाचे मंदिर आहे. याठिकाणी फक्त स्वयंभू महादेवाची पिंड असून याची चौकशी केली असता ही पिंड फार प्राचीन काळातील असल्याचे कळत असून सणसर येथील सर्व सोनार यांची असणारी शेती म्हणजे सोनारमळा म्हणून परिचित असलेल्या खाजगी शेतात ही महादेवाची पिंड असून महाशिवरात्री दिवशी सणसर परिसरातील वाडया वस्तीवरील भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येत असल्याचे लक्षात आल्यावर सणसर मधील सोनार समाजाने येणाऱ्या भाविकांसाठी खिचडी, दही,वेपर्स,केळी,राजगिरा वडी या फराळाची व्यवस्था करण्यात आली.दर्शनासाठी जवळपास पाचशे पुरुष महिलांनी लाभ घेऊन फराळ केला असल्याची माहिती महाराष्ट्र सराफ संरक्षण समितीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष जगदीश कांबळे व त्यांचे बंधू रमेश अण्णा कांबळे,गणेश कांबळे,दत्तात्रय कांबळे, बंडू कांबळे,यांनी माहिती दिली यावेळी इंदापूर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती तुकाराम काळे,माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे,शिवसेना उपतालुका प्रमुख विजय शिरसट,सोसायटी संचालक औदुंबर पाटील,संजय शिंदे,अनिल माने,विलास रायते,प्रकाश जगताप,राजेंद्र रायते,सामाजिक कार्यकर्ते विजय भाग्यवंत,रुपेश भोसले,प्रदीप कांबळे, असे भरपूर ग्रामस्थ व महिला उपस्थित होते.

# आरोग्य डेटा एका क्लिकवर

## राज्यात साडेपाच कोटींहून अधिक आयुष्मान खाती

**मुंबई**

राज्यातील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचा आरोग्य विषयी डेटा एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. यामुळे रुग्णाला कोणता आजार होता, कोणत्या प्रकारची औषधे सुरू आहेत ही माहिती डॉक्टरांना मिळणार आहे. यासाठी आयुष्मान भारत खाती तयार करण्यात येत आहेत. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत तब्बल ५ कोटी ७२ लाख ४१ हजार ३४२ आयुष्मान भारत खाती तयार करण्यात आल्याचे राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

मोफत व दर्जेदार आरोग्य सुविधा यामुळे देशभरातील रुग्ण राज्य सरकारच्या विविध रुग्णालयांत उपचारासाठी मोठ्या विश्वासाने दाखल होतात. सरकारी रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासह त्यांना ठणठणीत बरे करून घरी पाठवण्यासाठी रुग्णालय प्रशासन दिवसरात्र झटत असते. त्यात आता देशभरात आयुष्मान भारत डिजिटल मिशन योजना सुरू केल्यानंतर आरोग्य क्षेत्रात डिजिटल इको सिस्टम तयार करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यामुळे आरोग्य क्षेत्रात एक नवीन क्रांती होणार असून सर्व रुग्णालये, दवाखाने आणि प्रयोगशाळा डिजिटल होणार आहेत. तसेच डॉक्टरांना एका क्लिकवर रुग्णांच्या सर्व जुन्या आरोग्य नोंदी पाहता येणार आहेत. महाराष्ट्रामध्ये ३१ जानेवारी २०२५ पर्यंत ५,७२,४१,३४२ आयुष्मान भारत आरोग्य खाती तयार करण्यात आली आहेत आणि ४९,७१३ डॉक्टर आणि परिचारिका आणि २५,३७३ आरोग्य सुविधा एबीडी-एममध्ये नोंदणीकृत झाल्या आहेत, असे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

एबीडीएम अंतर्गत, नागरिक त्यांचा आभा (आयुष्मान भारत आरोग्य खाते) क्रमांक तयार करू शकतात आणि त्याचा वापर करून त्यांच्या डिजिटल आरोग्य नोंदी जोडून सुरक्षितपणे साठवू शकतात. यामुळे विविध आरोग्य सेवा प्रदान करणारे डॉक्टर व परिचारिका यांना तपशीलवार आरोग्य नोंदी तयार करणे शक्य होईल आणि वैद्यकीय तथा निदान आणि उपचाराविषयी निर्णय घेणे अधिक सोयीचे होणार आहे. या अभियानांतर्गत टेलिमेडी-सिन सारख्या तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देऊन आणि आरोग्य सेवांची राष्ट्रीय विकल्प चयन (पोर्टेबिलिटी) सक्षम करून दर्जेदार आरोग्य सेवेची उपलब्धता होईल. तसेच मोबाईलवर जवळचे हॉस्पिटल, डॉक्टर, लॅब आणि फार्मसी शोधणे शक्य होणार आहे.



### या राज्यात प्रयोग यशस्वी

लडाख, चंदीगड, दादरा आणि नगर हवेली, दमण, दीव, पुद्दुचेरी, अंदमान, निकोबार बेटे, लक्षद्वीप या प्रदेशांमध्ये नॅशनल अथॉरिटी ऑफ हेल्थ (एन.एच.ए) ने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचे यशस्वी प्रात्यक्षिकाने एबीडीएम पायलट प्रकल्प पूर्ण झाला आहे. एबीडीएम सार्वजनिक आरोग्य उपायांबाबत आधारित निर्णय घेण्यास मदतपूर्ण उपक्रम आहे.

---

जीवाची होतेय काहिली...



मुंबईतील वाळकेश्वर येथील बाणगंगा तलावात पोहण्याच्या निमित्ताने मुलांनी उन्हाळ्याच्या काहीलीतून दिलासा मिळविण्याच्या प्रयत्न केला. (छायाचित्र – विजय गोहिल)

---

# 'ते' कृत्य विनयभंगाचेच!

## ६६ वर्षांच्या आरोपीला कनिष्ठ न्यायालयाचा झटका

**मुंबई :** महिलेचा हात पकडणे, तिच्या गालाला स्पर्श करणे हादेखील विनयभंगाचा गुन्हा आहे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा देत गिरगावच्या दंडाधिकारी न्यायालयाने ६६ वर्षांच्या आरोपीला चांगलाच झटका दिला. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी शक्ती देशमुख यांनी आरोपीला एक हजार रूपयाच्या दंडासह एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठवली.

ताडदेव तुळशीवाडी येथील इमारतीत राहणारी तक्रारदार महिला २० डिसेंबर २०२३ रोजी आपल्या घरी जाण्यासाठी लिफ्टमध्ये गेली होती. त्यावेळी ६६ वर्षांचा बच्चूभाई दाफडा लिफ्टमध्ये आला. त्याने पहिल्यांदा महिलेचा हात पकडला आणि तिच्या गालाला स्पर्श केला. त्याच्या या कृत्याला महिलेने विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपीने तिचा हात सोडला नाही आणि मधेच सहाव्या मजल्यावर तो बाहेर गेला. महिलेने लिफ्टमधील सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने बच्चूभाई दाफडा याच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्याआधारे पोलिसांनी आरोपी दाफडाविरुद्ध गुन्हा दाखल केला.



### न्यायालयाचे निरीक्षण

खटल्याची सुनावणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी शक्ती देशमुख यांच्या समोर झाली. पोलिसांनी सादर केलेल्या पुराव्यांची न्यायालयाने दखल घेतली. तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या पुराव्यापेक्षा तक्रारदार महिलेच्या तोंडी पुराव्याला अधिक महत्त्व आहे. तांत्रिक बाबीवरून तक्रारदार महिलेचा पुरावा नाकारता येणार नाही, असे निरीक्षण नोंदवत आरोपीला विनयभंगाच्या आरोपाखाली दोषी ठरवत एक वर्षाचा सश्रम कारावास व एक हजार रुपयांचा दंड ठोठावला.

# होय, मी चूक केली! अलाहाबादियाची अखेर कबुली

**मुंबई :** वादग्रस्त टिप्पण्यांमुळे चर्चेत आलेला यूट्यूब पॉडकास्टर रणवीर अलाहाबादिया, याने महाराष्ट्र सायबरकडे जबानी नोंदविली. वादग्रस्त टिप्पण्या करून मी "चुक" केली, असे त्याने पोलिसांना सांगितले, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. कॉमेडियन समाय रैना याच्या यूट्यूब शो "इंडियाज गॉट लेटन"मध्ये अलाहाबादियाने पालक आणि लैंगिकतेविषयी चिड निर्माण करणाऱ्या टिप्पण्या केल्या होत्या. त्याच्या विधानामुळे सर्वत्र संतप्त प्रतिक्रिया उमटून त्याच्याविरुद्ध अनेक एफआयआर दाखल करण्यात आल्या होत्या.

अलाहाबादिया आणि आशिष चंचलानी महाराष्ट्र सायबर सेलच्या कार्यालयात सोमवारी उपस्थित झाले. त्यांनी त्यांच्या वादग्रस्त टिप्पण्यांच्या प्रकरणात आपला जबाब नोंदवला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. अलाहाबादियाने यूट्यूब शोवर वादग्रस्त टिप्पण्या करून चूक केल्याचे मान्य केले.

---

# अरुणा इराणी जखमी

**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेत्री अरुणा इराणी यांचे अलिकडेच मुंबई विमानतळावरचे फोटो व्हायरल झाले. अभिनेत्री अस्वस्थ असल्याचे त्यातून दिसले. एका वृत्तानुसार, इराणी या जखमी झाल्या असून परिणामी त्यांना व्हीलचेअरवरून आणले जात होते. पांढऱ्या सूटमध्ये अरुणा इराणी मास्क घातलेल्या आणि हातात पट्टी बांधलेल्या तसेच बाजुला कुबड्या घेतलेल्या दिसल्या. इराणी या दोन आठव-ड्यांपूर्वी बँकॉकमध्ये पडून जखमी झाल्या होत्या.

# अशिक्षित आहे म्हणून बचाव नाही

**मुंबई :** एक व्यक्ती अशिक्षिततेचे कारण देऊन अपराध करण्यासाठी बचाव घेऊ शकत नाही, असे सांगत बेलापूर येथील ५४ वर्षीय रहिवाशी हनुमान नायक यांची ५ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मागणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. नवी मुंबई महापालिकेने नायक यांच्या बेकायदेशीर बहुमजली इमारतीवर कारवाई करून ती पाडली. त्याविरोधात नायक यांनी नवी मुंबई पालिकेकडे ५ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मागितली होती. ही

### न्यायालयाची स्पष्टोक्ती

याचिका फेटाळून लावताना, अशा प्रकारच्या याचिका स्वीकारणे "बेकायदेशीरपणाला' प्रोत्साहन दिल्यासारखे होईल, असे न्यायालयाने नमूद केले.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि कमल खाता यांच्या खंडपीठाने हनुमान नायक यांची याचिका फेटाळून लावली. नायक यांनी त्यांचे ५० वर्ष जुने मोडकळीस आलेले घर तोडून २०२२ मध्ये पालिकेकडून कोणतीही पूर्वपरवा-नगी न घेता बहुमजली इमारत बांधली होती.

महाराष्ट्र क्षेत्रीय आणि नगर नियोजन (MRTP) कायद्याच्या कलम ५४ अंतर्गत १८ जुलै २०२२ रोजी नायक यांना पालिकेने नोटीस पाठविली, पण त्यांनी त्याला कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्याऐवजी, नायक यांनी २०२३ च्या जानेवारी महिन्यात बेलापूर सिव्हिल कोर्टात एक नागरी याचिका दाखल केली ज्यात पालिकेच्या नोटीसीला आव्हान दिले.

---

# दिव्यांगांसाठी मोफत सहाय्यक उपकरणे वाटप शिबीराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

RSS जनकल्याण समिती व BPCL यांच्या संयुक्त विद्यमाने



BPCL च्या CSR निधीतून दिव्यांगांसाठी तपासणी करून योग्य ते सहाय्यक उपकरणे वाटप शिबिराचे आयोजन गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी व शुक्रवार दि २८ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात करण्यात आले आहे .

**दिनांक 27 व 28 फेब्रुवारी 2025 रोजी**

सकाळी 10 ते 4 या वेळात दिव्यांगांची तपासणी रा.स्व.संघ जनकल्याण समितीचे डॉक्टर प्रभाकर पटवर्धन रुग्णालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबिराचा लाभ रायगड जिल्ह्यातील दिव्यांगांनी घ्यावा असे आवाहन हॉस्पिटल च्या वतीने करण्यात आले आहे तपासणीसाठी येताना खालील कागदपत्रे सोबत आणणे जरुरीचे आहे. आधार कार्ड आधार कार्ड (UDID कार्ड ),. रेशन कार्ड किंवा उत्पन्नाचे प्रमाणपत्र.,दोन फोटो .असे कागद पत्रे घेऊन येणे अधिक माहितीसाठी
:९१३६६५१९९४/ ८२३७६८०७५८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे हॉस्पिटल च्या वतीने सांगण्यात आले आहे .



# निफ्टी उच्चांकावरुन १४ टक्क्यांहून अधिक घसरला

## विक्रमी पातळीवरून सेन्सेक्समध्ये १३ .२३ टक्क्यांनी घट

**नवी दिल्ली :** भारतीय शेअर बाजारात मोठ्या प्रमाणात घसरण होत आहे. एनएसई निफ्टी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये त्याच्या उच्चांकापासून १४ टक्क्यांहून अधिक घसरला आहे. कंपन्यांच्या तिमाही निकालात खराब कामगिरी आणि वाढत्या जागतिक व्यापार तणावामुळे शेअर बाजारात नकारात्मक वातावरण आहे.

गेल्या वर्षी २७ सप्टेंबर रोजी बीएसई सेन्सेक्सने ८५,९७८.२५ हे विक्रमी शिखर गाठले आणि निफ्टीनेही त्याच दिवशी २६,२७७.३५ हा सर्वकालीन उच्चांक गाठला होता. तथापि, निफ्टी आतापर्यंतच्या उच्च पातळीपासून ३,७२९.८ अंक किंवा १४.१९ टक्क्यांनी घसरला. बीएसई सेन्सेक्स त्याच्या विक्रमी शिखरावरून ११,३७६.१३ अंक किंवा १३.२३ टक्क्यांनी घसरला आहे.

या वर्षी आतापर्यंत सेन्सेक्स ३,५३६.८९ अंकांनी किंवा ४.५२ टक्क्यांनी घसरला आहे आणि निफ्टी १,०९७.२५ अंकांनी किंवा ४.६४ टक्क्यांनी घसरला आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबरनंतर अनेकवेळा विक्रमी पातळी गाठल्यानंतर शेअर बाजारात घसरण होत आहे.

शेअर बाजार घसरण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत. अनेक मोठ्या कंपन्यांनी अपेक्षेपेक्षा कमी-तिमाही परिणाम नोंदवले तेव्हा गुंतवणूकदारांची भावना क्षीण झाली. शिवाय, ट्रम्पच्या आयात शुल्क आकारण्याच्या धमक्यांमुळे आणि भारताच्या मंदावलेल्या आर्थिक वाढीबद्दलच्या चिंतेमुळे भारतीय शेअर बाजारात नकारात्तमक वातावरणाचा आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार संस्थांकडून विक्रीचा मारा सुरु आहे.

### विदेशी संस्थांकडून निधी काढून घेणे, जागतिक व्यापार, तणावाचा परिणाम

मास्टर ट्रस्ट ग्रुपचे संचालक पुनीत सिंघानिया यांनी सांगितले की, सेन्सेक्समध्ये त्याच्या उच्चांकावरून १३ टक्क्यांहून अधिक घसरण झाली आहे. एफआयआयकडून मोठ्या प्रमाणावर निधी काढून घेणे, नकारात्मक तांत्रिक निर्देशक, कमकुवत कॉर्पोरेट कमाई आणि जागतिक आर्थिक चिंतेचे हे परिणाम आहेत. याव्यतिरिक्त, कमकुवत यूएस आर्थिक डेटा आणि महागाईवाढीच्या जोखमी, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्कवाढीची धमकी आदी कारणांनी शेअर बाजारातील वातावरणात अनिश्चितता वाढली आहे. विदेशी संस्थागत गुंतवणूकदार (FII) भारतीय इक्विटी मार्केटमधील त्यांचा हिस्सा सतत विकत आहेत, असेसिंघानिया पुढे म्हणाले की,

२०२५ मध्ये आतापर्यंत एकूण विदेशी निधी १ लाख कोटींवरुन अधिक काढून घेण्यात आला आहे. जागतिक अनिश्चितता आणि समभागांचे जादा मूल्यासह भारतीय रुपयातील कमकुवतपणा, निधी काढण्यास विदेशी गुंतवणूक संस्थांना चालना देत आहे. एफआयआय त्यांचे पैसे चीनसारख्या शेअर बाजारात अधिक आकर्षक मूल्यामुळे गुंतवत आहे. निधी काढून घेण्यास कारणीभूत ठरणारा आणखी एक घटक म्हणजे अमेरिकन अध्यक्षांची व्यापार धोरणे आणि त्यांचा उदयोन्मुख बाजारांवर होणारा परिणाम,असे ते पुढे म्हणाले.

---

# गोकुळवाडी शिवारातील दुकान फोडणारा एक आरोपी जेरबंद करुन रु.26,540/- किंमतीचा मुद्देमाल केला जप्त स्थानिक गुन्हे शाखाची कारवाई.

दैनिक युवक आधार
मराठवाडा विभाग
प्रमुख –राजु शिंदे.

दिनांक 25/02/2025 रोजी फिर्यादी नामे मनोज विठ्ठल येशाल, वय 44 वर्ष, व्यवसाय येस ट्रेडिंग दुकान रा. व्यंकटेश नगर, जालना यांनी तालुका पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली होती की, दिनांक 10/02/2025 रोजी 20.00 वा. ते 11/02/2025 रोजीची 09.30 वाजेच्या दरम्यान सरस्वती मंदीराच्या बाजुला गोकुळवाडी रोड जालना येथील त्यांचे मालकीचे येस ट्रेंडिंग दुकानातुन 80,000/- रु किंमतीचे मोटारचे स्टार्टर, मीटर पेटी, रेशम दोरी कोणतरी अज्ञात चोरट्यांनी चोरी केले आहे म्हणुन पोलीस ठाणे तालुका जालना गुरनं. 105/2025 कलम 303(2) भान्यसं प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल साहेब यांनी सुचना दिल्याने जालना शहरात माला विरुध्दचे गुन्हेबाबत माहिती घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी नामे आकिब मोहम्मद शेख, वय 29 वर्ष रा. मोरया नगर, सरस्वती मंदीरा जवळ, खरपुडी रोड जालना याने केला आहे. त्यामुळे आरोपी नामे आकिब मोहम्मद शेख, वय 29 वर्ष रा. मोरया नगर, सरस्वती मंदीरा जवळ, खरपुडी रोड जालना याचा शोध घेत असतांना तो त्याचे राहते घरी मिळुन आल्याने त्यास गुन्हयाचे अनुशंगाने विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली देऊन सदरचा गुन्हा हा त्याने व त्याच्या दोन साथीदाराने केला आहे. त्यास गुन्हयातील गेले माला बाबत विचारपुस केली असता त्याने त्याचे राहते घरातुन रु.26,540/- किंमतीचे स्ट्रार्टर व पॅनेल बॉक्स मुद्देमाल काढुन दिल्याने तो जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर सदर आरोपीकडे आणखी गुन्हयाबाबत विचारपुस केली असता त्याने व त्याचे दोन साथीदाराने खरपुडी चौफुली येथील किराणा दुकानात चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यामधील मुददेमाल त्याच्या फरार साथीदाराकडे असल्याचे सागितले त्यामुळे सदर गुन्हयाची माहिती घेतली असता पोलीस ठाणे तालुका जालना गुरनं. 106/2025 कलम 303 (2) भान्यासं प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशिक, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर, ईरशाद पटेल, सतिष श्रीवास, संदीप चिंचोले, रमेश काळे, सौरभ मुळे सर्व स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे.



# आश्रय नर्सिंग होम येथे फेको पद्धतीचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

## 86 रुग्णांनी घेतला लाभ ; 40 रुग्णांची होणार शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

डॉ. अजय गुप्ता व डॉ. प्रबोधिनी गुप्ता यांचे आश्रय नर्सिंग होम (गुप्ता हॉस्पिटल) यांच्या रुग्णालयातील 35 वर्षाच्या प्रदीर्घ रुग्ण सेवे निमित्त फेको पद्धतीचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर सरपंच सुप्रिया महाडिक, डॉ. गंगाराम कोकणे,डॉ. अजय गुप्ता व डॉ. प्रबोधिनी गुप्ता, डॉ.अनिल गीते यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच आयोजित करण्यात आले. या शिबिराचा 86 रुग्णांनी लाभ घेतला असून त्यामध्ये 40 रुग्णांची शस्त्रक्रिया होणार असून रुग्णांना फेको लेझर फोल्डेबल लेंस बसविणार असल्याची माहिती डॉ. अजय गुप्ता यांनी दिली. रुग्णालयाला 35 वर्षे यशस्वी रुग्ण सेवेनिमित्त दोन दिवस चाललेल्या या शिबिरात पूर्ण तपासणी करून नोंदणी झालेल्या 86 रुग्णांची डॉ. प्रबोधिनी गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अदित गुप्ता,डॉ. प्रेरणा गुप्ता, डॉ. अनिल जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी तपासणी केली. यासाठी फेको तंत्रज्ञान मशीन उपलब्ध करण्यात आली आहे. एकुण 40 रुग्णांची टप्पा टप्प्याचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यामध्ये रविवार 23 फेब्रुवारी पहिला टप्प्यात 10 रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्यांच्या डोळ्यांना फेको लेझर फोल्डेबल लेंस बसविण्यात आल्याची माहिती डॉ. अजय गुप्ता यांनी दिली॰ या कार्यक्रमाला डॉ. आदित गुप्ता डॉ. प्रेरणा गुप्ता, डॉ.सादिया दफेदार, डॉ.विजया माने यांच्यासह विवेक सुभेकर, लिलाधर पाटील, ऑप्टीसियन अजित दळवी, परिचारिका जयश्री मनवे तसेच रुग्ण व नागरिक उपस्थित होते.

